VOL- VII ISSUE- X OCTOBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# ऑनलाईन शिक्षणाचा विद्यार्थ्यांवरील परीणामांचा अभ्यास

**डॉ.रामानंद बापुराव व्यवहारे,**
सहयोगी प्राध्यापक,
वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.

**सारांश :-**

*कोविड-१९ च्या कालावधीत ऑनलाईन शिक्षणाचा प्रयोग अभूतपूर्व समजला जातो. तो आपत्कालीन महत्वपूर्ण आणि उपयुक्त असला तरी जगात भारतासारख्या खंडप्राय, विकसनशील राष्ट्राला परवडणारा नाही. याचा फारसा विचार न करता शासनाने आदेश काढून अंमलबजावणी सुरु केली आहे. याबद्दल कोणत्याच घटकाला विश्वासात घेण्याची गरज सरकारला वाटली नाही. इच्छा असो अथवा नसो सर्वांना ऑनलाईन शिक्षणात सहभागी होण्याचे फर्मान सोडण्यात आले आहे. साधनांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असल्याने, खरेदीची आर्थिक क्षमता तसेच तंत्रज्ञानाची उपलब्धता नसल्याने बहुसंख्य विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून दूर आहेत. समाजमाध्यमे, प्रसारमाध्यमे, नवे तंत्रज्ञान शिक्षणासाठी वापरून शासन फार मोठे नुकसान करू पाहात आहे. भारतीय शिक्षणासाठी ऑनलाईन शिक्षण हा कधीच पर्याय ठरू शकत नाही. आकलन, संकल्पनांचे स्पष्टीकरण, मेंदुचा विकास, प्रग्लभता, प्रात्याक्षिकीकरण, अनुभवीकरणाच्या शाश्वत वाढीसाठी ऑनलाईन शिक्षण घातक आहे. त्याचे शरीर, मनावरील दुष्परिणाम अनेक आहेत. त्यामुळे भारतातील मनुष्यबळीची नवी पिढी कुचकामी ठरु शकते.*

**प्रस्तावना :-**

ऑनलाईन शिक्षण सर्वत्र सुरु आहे. सरकारने ऑनलाईन शिक्षण सुरु ठेवण्याची घोषणा करून आपली कार्यक्षमता लोकांसमोर ठेवली आहे. परिक्षा होणार की नाही यावर बरेच राजकारण, चर्चा झाली अखेर न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. परीक्षा झाल्या. एम.सी.क्यू. (मल्टीपल चॉइस क्वशन) पॅटर्नप्रमाणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले गेले. ऑनलाईन शिक्षण सुरु असून यापासून अनेक विद्यार्थी वंचित आहेत. यावर कोणीही बोलायला तयार नाही. समान शिक्षणाचा कायदा विसरला जात आहे. इच्छा असो अथवा नसो, सुविधा असो अथवा नसो विद्यार्थी, पालक, शिक्षकांना ऑनलाईन शिक्षणासाठी तयार करण्यात आले आहे. एक प्रयोग, नावीन्यपूर्णता म्हणून सर्वांना त्याचे कुतुहूल वाटले; परंतु त्याच्या दुष्परिणामांबद्दल विचार, चर्चा झाली नाही. जागतिकीकरणात शिक्षण ही फक्त श्रीमंतांची मक्तेदारी होऊ पाहातेय, ऑनलाईन शिक्षण हा त्याचा पाया आहे. दूरगामी होणा-या दुष्परिणामांचा अभ्यास केला असता हे शिक्षण कशासाठी, कोणासाठी आणि का असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

**उद्देश :-**

१) ऑनलाईन शिक्षणाबद्दलच्या केंद्र, राज्य सरकारच्या आदेशामागील हेतू स्पष्ट करून सांगणे, त्याबद्दल चर्चा करणे.

२) ऑनलाईन शिक्षणाचे स्वरुप आणि व्याप्तीची मांडणी करणे.

३) ऑनलाईन शिक्षणामधील विद्यार्थ्यांसह पालकांचा सहभाग स्पष्ट करून सांगणे.

४) ऑनलाईन शिक्षणाचा विद्यार्थ्यांवर होणा-या दुरगामी परिणामांचा अभ्यास मांडणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय "ऑनलाईन शिक्षणाचा विद्यार्थ्यांवरील परिणामांचा अभ्यास" (Study of Effects on Students of Online Education) असा आहे. यामध्ये कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीत ऑनलाईन शिक्षणाबद्दल केंद्र आणि राज्य सरकारच्या आदेशामागील हेतू स्पष्ट करून त्याबद्दलची चर्चा केली आहे. ऑनलाईन शिक्षणाचे स्वरुप आणि व्याप्ती कशा प्रकारची आहे. याबद्दलची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. ऑनलाईन शिक्षण ज्या विद्यार्थ्यांसाठी आहे त्या विद्यार्थ्यांचा सहभाग किती आणि कशा प्रकारचा आहे.

याबद्दल विद्यार्थ्यांच्या पालकांची भूमिका कशा प्रकारची आहे. त्यांचा सहभाग आहे का ? कसा आहे ? याबद्दलचे स्पष्टीकरण केले आहे. ज्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाचा संपूर्ण खटाटोप सुरु करण्यात आला आहे. त्याचे विद्यार्थ्यांवर आगामी कालावधीत दूरगामी कोणते परिणाम होतील. होऊ शकतील त्याची अभ्यासपूर्ण मांडणी करण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्या अनुषंगाने शोध निबंधाची मांडणी करीत असतांना वर्तनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमांव्दारे (वृत्तपत्र) प्रकाशीत बातम्या, वृत्तलेख, आग्रलेख यांचे संदर्भ अभ्यासले आहेत. तज्ञांनी लिहिलेल्या लेखांचा आधार घेलता आहे. लेखकाने स्वतःची मते, अनुभव, निरिक्षण, दृष्टिकोन इत्यांदीच्या आधारे शोधनिबंधांची मांडणी केली आहे.

**ऑनलाइन शिक्षणाचे हेतू :-**

कोविड-१९ हा संसर्गजन्य विषाणू भारतात मार्च-२०२० मध्ये आला. एप्रिल, मे २०२० या दोन महिण्यात त्याने आपले हातपाय पसरुन जनजीवन विस्कळीत करून टाकले. सर्वत्र टाळेबंदी लागली. या परिस्थीतीत केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने जुलैमध्ये महाविद्यालयाचे वर्ग (व्दितीय व तृतीय वर्ष) एक ऑगस्टपासून ऑनलाईन पध्दतीने घेण्याचे आदेश काढले. एवढेच नाही तर विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व शैक्षणिक कार्ये ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्यासाठीचे पत्र (आदेश) देशभरातील कुलगुरुंमार्फत विद्यापीठ, महाविद्यालयांना दिले. महाराष्ट्रातील शालेय शिक्षण विभागाने मे मध्ये शाळा बंद ठेवून शिक्षण मात्र सुरु ठेवण्याचे सांगून तसे आदेश काढले. 'शाळा बंद शिक्षण सरु' अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्र्यांनी करून टाकली. सर्व शाळांना ऑनलाईन शिक्षण देण्याचे आदेश काढले. खाजगी विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी यापुर्वीच ऑनलाईन शिक्षणाची तयारी सुरु केली होती. आपले प्रवेशित विद्यार्थी, नवीन प्रवेश घेणारे विद्यार्थी इतरत्र जाऊ नये. त्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. फीस घेता यावी यासाठी ऑनलाईन वर्ग सुरु केले. शासनाला शिक्षण बंद पडू द्यायचे नव्हते; परंतु या शिक्षणाची उपयुक्तता तपासल्यास त्यामधून फार काही हाती लागणार नाही असे वाटते.

**ऑनलाईन शिक्षणाचे स्वरुप आणि व्याप्ती :-**

केंद्र, राज्य सरकारने ऑनलाईन शिक्षणाचे आदेश काढल्यानंतर सर्वप्रथम केंद्र सरकारने दिक्षा ॲप सुरु केले. राज्य सरकारने तीन चॅनलचे उद्घाटन केले. दूरदर्शन या शासकीय दुरचित्रवाणी वाहीणीची मदत घेण्यात आली. इकडे गुगलनेही ऑनलाईन शिक्षण, बैठका, प्रशिक्षण कार्यक्रमात उडी घेतली. त्यापाठोपाठ जीओ यामध्ये उतरले. अनेक ऑनलाईन पोर्टल्स्, कंपन्या, फर्म सुरु झाल्या. ॲप आले. अनुभव नसतांना शिक्षक, प्राध्यपकांना ऑनलाईन शिक्षणात सहभागी करून घेण्यात आले. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक सर्वच घटक कोरोनामुळे भेदरलेले असतांना, जीव मुठीत धरुन जगण्यासाठी मोठ्या भितीखाली वावरताना शिक्षण विभाग मात्र ऑनलाईन शिक्षणात गुंतलेले होते. काही शिक्षकांना कोविड ड्यूटी लावण्यात आली. नोकरीच्या भितीपोटी सर्वजण ऑनलाईन शिक्षणात सहभागी झाले होते. आपापला परीने व्हाईस रेकॉर्डींग, व्हिडीओ तयार करून, इतरांचे व्हिडीओ फॉरवर्ड करून ड्युटी करू लागले. इकडे केंद्र, राज्य सरकारच्या आरोग्य विभागाला कोविड-१९ चा काहीही अंदाज येत नव्हता. शिक्षण सुरु ठेवण्याच्या हेतूसाठी ऑनलाईन शिक्षण सुरु करण्यात आले असे सांगण्यात येत होते.

**ऑनलाईन शिक्षणातील पालक विद्यार्थ्यांचा सहभाग :-**

ऑनलाईन शिक्षणाचा निर्णय सरकारने घेतला. त्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक या महत्वपुर्ण घटकांना अजिबात विश्वासात घेतले असे दिसत नाही. तशी गरज सरकारला वाटल्याचे दिसले नाही. खाजगी शाळांच्या चालकांनी ऑनलाईन शिक्षणाचा आग्रह सुरुवातीलाच धरला होता. ते यामध्यें अग्रेसर होते. त्यांनी पालकांकडून फी वसुली सुरु केली होती. फी न देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी ऑनलाईन शिक्षणातून वगळले होते. यामध्ये न्यायालयालाही हस्तक्षेप करावा लागला होता. दुसरीकडे काही स्वंयसेवी संस्था, पालक, ऑनलाईन शिक्षणाच्या विरोधात न्यायालयात गेले असता न्यायालयाने त्यांना देशद्रोही ठरवले. "ऑनलाईन वर्गांना (ई-लर्निंग) प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या निर्णयावर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित करत असेल तर ते देशहितविरोधी कृत्य आहे. अशी टिप्पणी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केली."[1] यावरून न्यायालयाचा हेतू स्पष्ट होतो.

**पालकांचा सहभाग :-**

पालकांची उत्पन्नाची साधने (नोकरी, व्यवसाय) कोरोनाने हिरावली, टाळेबंदीत जगायचे कसे ? हा मोठा प्रश्न निर्माण झाल्याने अनेक पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे साफ दुर्लक्षच केले. एवढे एक वर्ष जाऊ द्या. पुढील वर्षी पाहू असे म्हणत ऑनलाईन शिक्षणाकडे पाठ फिरविली. महागडी मोबाईल, लॅपटॉप, कंम्प्युटर, आयपॅड, टॅब खरेदी करण्याएवढी आर्थिक परिस्थिती अनेक पालकांची नाही. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टीव्हीटी

नाही. "ॲक्टिव्ह टिचर्स फोरमच्या सर्वेक्षणानुसार केवळ २७ टक्के पालकांकडे इंटरनेट सुविधा आहे."[2] त्यामुळे पालकांची ऑनलाईन शिक्षणाची तयारी खूपच थोडी असल्याचे स्पष्ट होते. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या महाराष्ट्रातील मोठ्या शहरातील शाळांनी विद्यार्थ्यांबरोबर पालकांनाही ऑनलाईन शिक्षणाची गुंतविले. ऑनलाईन विद्यार्थ्यांबरोबर पालकांनाही ऑनलाईन शिक्षणासाठी गुंतविले. "ऑनलाईन शिक्षणाचे मुलांना नीट आकलन होत नाही. ऑनलाईन वर्ग संपल्यानंतर गृहपाठ पीडीएफव्दारे पाठविला जातो. मुलांना पीडीएफ हाताळता येत नसल्याने पालकांना गृहपाठ हाताने कागदावर लिहून घ्यावा लागतो. यासाठी पालक तयार नाहीत."[3] एकाच घरात कमीत कमी दोन मुलांचा अभ्यास ऑनलाईन सुरु झाल्यानंतर भयभीत, त्रस्त, विविध समस्यांनी ग्रस्त पालकांचा यासाठी कसा प्रतिसाद राहीला याबद्दल आपण सर्व विचार करून शकतो. इकडे प्रसारमाध्यमे दूरचित्रवाणी वाहिण्या, वृत्त वाहिण्या, रेडीओ, वृत्तपत्र आणि समाजमाध्यमे कोरोनाच्या भयंकर बातम्या, वृत्तलेख स्टो-या आपल्याला भयभित करीत होत्या. एवढे दिवस स्क्रीनपासून मुलांना दूर ठेवा असे सांगणारे तज्ञ आता गप्प होते. स्क्रीनचे दुष्परिणाम स्वतः अनुभवणारे पालक मात्र भांबावून गेलेले दिसत होते.

**विद्यार्थ्यांचा सहभाग :-**

विद्यार्थी परीक्षा नसल्याने आनंदात होते. त्यांना परीक्षेविना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार होता. महाविद्यालयीन तृतीय वर्षातील विद्यार्थी बेचैन होते. परीक्षा रद्द होणार याचा निर्णय होत नव्हता. अखेर परीक्षा होणार असा निर्णय झाला. शिक्षकाचे ऑनलाईन आलेले रेकॉर्डींग व्हीडीओ समजत नव्हते. ४० ते ६० टक्के विद्यार्थी या ऑनलाईन शिक्षणापासून दूर होते. शाळा बंद शिक्षण सुरु याचा नेमका अर्थ आता विद्यार्थ्यांना कळू लागला होता. "महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यात साधने नसल्याने १८ ते ६५ टक्के मुले ऑनलाईन शिक्षणापासून वंचित आहेत."[4] यावरून स्पष्ट होते की, ४० टक्क्यांच्या आसपास मुले ऑनलाईन शिक्षणात सहभागी आहेत. ऑनलाईन शिक्षण देण्याचा, शिकविण्याचा कोणताही अनुभव नसलेल्या शिक्षकांचे ऑनलाईन व्हिडीओ पहिल्यानंतर मुलांना समजत असतील काय ? एकतर्फी संवादातून विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतात काय ? त्यांना काय आणि किती आकलन होऊ शकत असेल? असे अनेक प्रश्न तयार झाले. उच्च शिक्षणात तर ६० ते ७० टक्के विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाला काहीही प्रतिसाद देत नसल्याचे आढळून आले आहे. अकरावी, बारावी, व्यावसायिक अभ्यासक्रमांचे विद्यार्थी फक्त शरीराने मारुनमुटकून ऑनलाईन शिक्षणात सहभागी झाल्याचे दिसून येते. आशय, संकल्पना समजून घेण्यामध्ये ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कुचकामी ठरले आहे. थोडक्यात, ऑनलाईन शिक्षणातील पालकांचा सहभाग जवळ जवळ ३० ते ४० टक्के आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग जवळपास नाही असे स्पष्ट होते. शिक्षणात, शिक्षण देण्या-घेण्याच्या प्रक्रियेत, व्यवस्थेत खंड पडू न देणे, अनेक द-या निर्माण करण्याचे कार्ये ऑनलाईन शिक्षणाने केल्याचे दिसून येते.

**ऑनलाईन शिक्षणाचे विद्यार्थ्यावरील परिणाम :-**

शाळा, महाविद्यालयीन शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु झाले. याबद्दल कोणीही फार जाहीरपणे बोलतांना दिसले नाहीत. शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मात्र "शाळा सुरु करण्याचा निर्णय चुकीच्या पध्दतीने घेतला असल्याचे जाहीरपणे सांगून विषमता निर्माण करणारे ऑनलाईन शिक्षण बंद करा. प्रत्येकासाठी ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करता येत नाही तोपर्यंत ते बंद ठेवा"[5] असे जाहीरपणे सांगितले. ऑनलाईन शिक्षणाचे दूरगामी दुष्परिणाम सांगण्यासाठी शिक्षणतज्ञ फारसे पुढे आलेले आढळले नाहीत. "शिक्षक प्रतिनिधी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष कालिदा माने, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रा. डॉ. सूर्यनारायण, रणसुभे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी ऑनलाईन शिक्षणामुळे नवा वर्गवाद, विषमता निर्माण होण्याची भिती व्यक्त करून ते थांबविण्याची मागणी केली."[6] पण, या मागणीकडे कोणीही लक्ष दिले नाही. नंतर अशी मागणी करणारे पुढे आलेले दिसले नाहीत.

कोविडची सध्याची परिस्थितीही कधी बदलेल सांगता येत नाही. तज्ञ वेगवेगळे अंदाज बांधत आहेत. त्यामुळे आपण सर्व भयभीत आहोत. सध्याच्या परिस्थितीत ऑनलाईन शिक्षण हे सर्वात सोयीचे माध्यम आहे मात्र, त्यासाठीची साधने सर्वांकडे नसल्याने ते विषमता निर्माण करणारे ठरते. एका अभ्यासानुसार फक्त ३० टक्के विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणासाठी तयार आहेत. ७० टक्के विद्यार्थ्यांना वगळून शिक्षण देणार का ? हा खरा प्रश्न आहे. यातून आहेरे नाहीरे हा नवा वर्ग तयार होईल. उद्या शाळा, कॉलेजमध्ये येणा-या विद्यार्थ्यांमध्ये आपण ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिल्याचा न्यूनगंड तयार होईल. शिक्षक, प्राध्यापक ऑनलाईन वर्ग पुन्हा ऑफलाईन घेणार नाहीत. डबल ड्युटी करायला ते तयार होतील असे वाटत

नाही. सध्या ते ऑनलाईन टीचिंगमध्ये मोठ्या तणावाखाली दिसत आहेत.

"आज जगभरातल्या पालकांना कशाची चिंता असेल तर घरोघरी वाढलेल्या लहान मुलांच्या स्क्रीन टाईमची. लॉकडाऊनपुर्वी आणि आता सध्याच्या परिस्थितीत शाळा, महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थी दुप्पट वेळ स्क्रीनवर घालवित आहेत. घालवावा लागतो आहे. हा वाढत्या स्क्रीन टाईमचा सा-या समाजावरच दूरगामी आणि गंभीर परिणाम होऊ शकतो, असे केंब्रीज विद्यापीठाचा अभ्यास म्हणतो. 'द लॅसेट चाईल्ड ॲन्ड अडोलसंट हेल्थ जर्नल' मध्ये नुकताच प्रसिध्द झालेला हा अभ्यास म्हणतो, ५ ते २५ या वयोगटातील मुलं, तरुणांच्या स्वास्थ्यावर सोशल डिस्टन्सिंगचा खोलवर परिणाम होऊ शकतो. कोरोनाकाळ सरला तरीही एकटं राहण्याचे, प्रत्यक्ष मानवी संपर्कच नसण्याचे परिणाम दीर्घकाळ टिकतील आणि सर्व प्रश्न निर्माण करतील. आजच चिडचिड, अस्वस्थता, नैराश्य, आक्रमकता आणि स्वतःला इजा करून घेणं हे सारं या वयोगटात वाढीस लागलेलं आहे. अर्थात आज हा सारा विचार करायला कुठल्याच देशातल्या व्यवस्थांना वेळ नाही आणि दुदैवाने तो आजचा प्राधान्यक्रमही नाही"[7] ऑनलाईन शिक्षणाचा निर्णय घेऊन, त्याची अंमलबजावणी करून शासन, शासनातील आयएएस लॉबी देशातील नव्या पिढीसह सर्वांचेच किती मोठे नुकसान करु पाहातेय ते यावरून स्पष्ट होते.

सध्या स्क्रीनसह ऑनलाईन तंत्रज्ञानाने सर्वांच्याच तीन महत्वाच्या अवयवांवर थेट ताबा मिळविल्याचे दिसते. डोळे, डोके, पाठ. स्क्रीनमुळे डोळे कोरडे पडतात. चुरचुरतात, लाल होतात. धुसर दिसतं, डोळ्याला पाणी येतं, डोक सुन्न होतं. डोळयासमोर सतत स्कीन राहिल्याने मान आणि पाठ ठणकते. थकवा जाणवणं, डोकं जड पडणं, उगीच चीडचीड होणं. पाय दुखणं कुणाशीही बोलू नये असं वाटणं अशा समस्या उद्‌भवतात. विद्यार्थ्यांच्या बाबतीत आगामी काळात या समस्या वाढतील. ताणतणावग्रस्त विद्यार्थी आत्महत्या करतील. या समस्यांबद्दल कोणीही बोलायला तयार नाही. मानवी वर्तन, स्वभाव, मानसिकता भंगल्यास शिक्षणाचा फायदा, उपयोग कोण आणि कशासाठी घेईल. हा मोठा भयानक प्रश्न आहे.

ऑनलाईन शिक्षणातून आकलन होत नाही. संकल्पना स्पष्ट होत नाहीत. "वैद्यकीय, अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रयोगशाळेचं महत्व असतं. प्रत्यक्ष पाहणं, स्वतः अनुभवातून समजून घेणं हे प्रत्येकासाठीच आवश्यक. शाळेतल्या प्रयोगशाळेत होणा-या प्रयोगाबाबतही असंच. ते छोट्या पडद्यावर पाहून समजणं शक्य असेलही; परंतु त्यातून विषय मुळापासून संमजेलच असं नाही."[8] त्यामुळे ऑनलाईन शिक्षणातून मनुष्यबळ कौशल्ये वाढेल याची अजिबात शक्यता वाटत नाही. इंग्रजांनी तयार केलेली क्लार्कची फौज आणि बेकारांची संख्या भरमसाट वाढू शकेल.

"डिजीटल बिहेव्हिअर कंन्सल्टंट आता असंही म्हणू लागले आहेत की, मानवी समाजाने आजवर अनेक प्रकारचे भेद पहिले आहेत. संघर्ष अनुभविले आहेत. गरीब, श्रीमंत, जात, वर्ग, वर्ण, रंग, धर्म, यापलीकडे जाऊन आता ज्यांच्याकडे डिजीटल ॲक्सेस कमी आहे किंवा डिजिटल जे साक्षर नाहीत, त्यांचा गुणवत्तेवरही समाज प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकतो. डिजिटल ॲडव्हान्टेज असलेले नव्या काळात वेगानं पुढं सरकतील किंवा त्याना संधीची दालने अधिक लवकर खुली होतील. अशी शक्यता आहे."[9] ऑनलाईन शिक्षणातून समाजात भेदभाव निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे समानतेच्या भारतीय राज्यघटनेच्या तत्वाला मोठा छेद बसेल. सर्व विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची उपलब्धता शासनाने करून दिल्यानंतरही ऑनलाइन शिक्षण घातकच ठरेल कारण ख-या भारतीय शिक्षणाला, कोविडसारख्या घातक परिस्थितीलाच काय इतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन शिक्षण कधीच पर्याय ठरू शकत नाही.

**समारोप :-**

ऑनलाईन शिक्षणाची घोषणा होताच अनेक कंपन्यांनी आपापले तांत्रिक प्लॅाटफॉर्म तयार करून संस्थांना दिले आहेत. त्याबद्दलचे करार पूर्ण केले आहेत. शिक्षणाचे व्यापारीकरण, खाजगीकरण यापूर्वी झाले आता तांत्रिकीकरण सुरु झाले. आहे. यातून सरकारला काय साध्य करायचे आहे हे समजत नाही. शिक्षणाला शिक्षकांपासून दूर करून शिक्षणातील शिक्षकांची संख्या कमी करून ते तंत्रज्ञानाच्या हवाली करण्याचा हेतू असू शकतो. त्यामुळे संर्वाचेच फार मोठे नुकसान प्रस्तावित आहे. शिक्षकाला कधीच पर्याय असू शकत नाही. हे सर्वांनी लक्षात घेण्याची गरज आहे. ऑनलाईन शिक्षण सुरु करून शासनाने शिक्षणातील ख-या समस्या सोडविण्यापासून पळ काढल्याचा संशय येतो. नवीन समस्या निर्माण झाल्या असून त्या न परवडणा-या आहेत. कोविड-१९ जाईल तेव्हा ऑनलाईन शिक्षण बंद केले पाहिजे. दरम्यानच्या सहा

महिन्याहून अधिक कालावधीतील ऑनलाईन आभ्यासक्रम पुन्हा शिकवला गेला पाहिजे. त्यासाठी शिक्षकांनी तयार राहीले पाहिजे. शासनाने शिक्षणातील मूळ, मूलभूत समस्या सोडविण्याला प्राधान्य द्यावे. किमान शिक्षणात तरी राजकारण करू नये.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1) दै. लोकमत, संपादक- सुधीर महाजन दि.5 जुलै 2020 च्या अंकातील पृष्ठ-7 वरील 'महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्षही ऑनलाईन पध्दतीने' वृत्तलेख.

2) दै. लोकमत, संपादक- सुधीर महाजन दि. 7 जुन 2020 च्या मंथन पुरवणीतील पृष्ठ-4 वरील 'शासन' लेख.

3) दै. लोकसत्ता, संपादक- गिरीश कुबेर, दि. 10 जून 2020 च्या अंकातील पान 1 वरील 'ऑनलाईन शिक्षणाच्या सोसाने कुटूंब बेजार' वृत्तलेख.

4) दै. लोकसत्ता, संपादक -गिरीश कुबेर, दि. 22 जून 2020 च्या अंकातील पान 3 वरील 'दिशाहीन शिक्षणदीक्षा' रसिका मुळ्ये यांचा लेख.

5) दै. लोकमत, संपादक -सुधीर महाजन, दि. 3 जुलै 2020 च्या अंकातील पान 1 वरील 'शाळा सुरु करण्याचा निर्णय चुकीच्या पध्दतीने घेतला' वृत्तलेख.

6) दै. लोकसत्ता, संपादक - गिरीश कुबेर, दि. 19 मे 2020 च्या अंकातील पान-4 वरील 'ऑनलाईन शिक्षणामुळे नवा वर्गवाद ? ' प्रदीप नणंदकर यांचा वृत्तलेख.

7) दै. लोकमत, संपादक -सुधीर महाजन, दि. 24 जून 2020 च्या अंकातील पान 6 वरील 'झोप का उडाली' ? लेख.

8) दै. लोकसत्ता, संपादक - गिरीश कुबेर, दि. 11 जुलै 2020 च्या अंकातील 'घरातली शाळा' अग्रलेख.

9) दै.लोकमत, संपादक - सुधीर महाजन, दि. 23 जून 2020 च्या अंकातील पान 6
वरील 'कनेक्टेड एकेकटे' लेख